**पूर्व मंजूरीसाठी**

**मुंबई शहर जिल्ह्याच्या प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांवरिल (Coastal Zone Management Plans),2019 अंतर्गत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी जी.एस.आर.37 (इ), दिनांक 18 जानेवारी, 2019 रोजी नविन सागरी नियमन क्षेत्र (Coastal Regulation Zone- CRZ), 2019 प्रसिध्द केली. सदरहू अधिसुचनेच्या तरतुदींनुसार केंद्र शासन प्राधिकृत्त संस्थेमार्फत सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Coastal Zone Management Plans - CZMPs) अद्दयावत / तयार करणे अपेक्षित आहे.

त्याअनुषंगाने, सदरहू काम महाराष्ट्र शासनाने नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नई, तामीळनाडू, या केंद्र शासन प्राधिकृत्त संस्थेस दिले होते. ,

नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नईया संस्थेने मुंबई शहर जिल्ह्याचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे, 2019 तयार करण्याचे काम पूर्ण केले आहे. त्यानुसार सीआरझेड, 2019 अधिसुचना मधील परिशिष्ट IV, परिच्छेद 6 नुसार मुंबई शहर जिल्ह्याचे उक्त प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे हे सर्व जनतेच्या सूचना, हरकती, आक्षेप आमंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने संकेतस्थळावर प्रसिध्द केले होते.

त्याअनुषंगाने, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीबुधवार, दिनांक 04 मार्च, 2020 रोजी दुपारी 12.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय-मुंबई शहर, जुने कस्टम कार्यालय, फोर्ट, मुंबई – 400 001 येथे आयोजित करण्यात आलेली होती .

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक 14-09-2006 व सुधारित अधिसुचना दिनांक 01-12-2009 अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- 19 / 2020 व्दारा पत्र क्रं/बीओ.जेडी/पीएच/पीसीडब्लु/बी-809दिनांक 02 मार्च, 2020 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| 1) जिल्हादंडाधिकारी - मुंबई शहर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| 2) प्रादेशिक अधिकारी-मुंबई<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | **सदस्य** |
| 3) उप प्रादेशिक अधिकारी,मुंबई-1 | - | **समन्वयक** |



Scanned with CamScanner

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई

डॉ. अनंत हर्षवर्धन, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, केंद्र शासन प्राधिकृत्त संस्था नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नईयांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण तज्ज्ञ व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केलेसमितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली .

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2006 व सुधारित दिनांक 1 डिसेंबर, 2009 च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्प/योजना यांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे .

डॉ. हर्षवर्धन, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीयांनी असे सांगितले की, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी जी.एस.आर.37 (इ), दिनांक 18 जानेवारी, 2019 रोजी नविन सागरी नियमन क्षेत्र (Coastal Regulation Zone- CRZ), 2019 प्रसिध्द केले. सदरहू अधिसुचनेच्या तरतुदींनुसार केंद्र शासन प्राधिकृत्त संस्थेमार्फत सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Coastal Zone Management Plans - CZMPs) अद्ययावत / तयार करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र शासनाने सदरहू काम नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नई, तामीळनाडू, या केंद्र शासन प्राधिकृत्त संस्थेस दिले होते.

नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नईया संस्थेने मुंबई शहर जिल्ह्याचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे, 2019 तयार करण्याचे काम पूर्ण केले आहे. त्यानुसार सीआरझेड, 2019 अधिसुचना मधील परिशिष्ट IV, परिच्छेद 6 नुसार मुंबई शहर जिल्ह्याचे उक्त प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे हे सर्व जनतेच्या सूचना, हरकती, आक्षेप आमंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने संकेतस्थळावर प्रसिध्द केले व मप्रनि मंडळाने संचालक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, 15 वा माळा नविन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई -400 032 यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे.

सदस्य, यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प किंवा योजनांमुळे सामान्य जनतेस प्रकल्पामुळे / योजनांमुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे आहे .

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार 30 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक त्याअनुषंगानेजिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता



Scanned with CamScanner

यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक 04फेब्रुवारी, 2020 रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होतीत्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते .

सदस्य यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित योजनेबाबत मप्रनि मंडळ कार्यालयास विविध सूचना, आक्षेप प्राप्त झालेले आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी किंवा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.डॉ. हर्षवर्धन यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती माअध्यक्षांना . .केली

श्री बन्सी गवळी , प्रभारी जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्राधिकृत्त संस्थेच्या प्रतिनिधी /पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले .

प्राधिकृत्त संस्थेच्या प्रतिनिधी /पर्यावरण सल्लागारांनीयोजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

1) **आमदार मंगलप्रसाद लोढा, राहणार-मुंबई, जिल्हा-मुंबई:-**

मी ग्रेथे दोन सूचना करण्यास आलेलो आहे. एमएसआरडीसीचा एक नेपियन सी रोडवर एक भूखंड आहे. त्यात प्रथम भराव टाकण्यात आला. तो भूखंड प्रथम सीआरझेड-1 मध्ये होता. त्यास अवैधपणे सीआरझेड-2 मध्ये वर्गीकृत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आज आलेल्या स्थानिक वृत्तपत्रातील बातमीनुसार, तेथे टेन्डर काढून बहूमजली इमारत विकसित करण्यासाठी जनतेस सार्वजनिक संधिचा (ऑफर) घाट घातलेला आहे. तरी नेपियन सी रोड, ब्रीजकँडीवरिल रहिवाशांकडून आपणास विनंती करण्यात येते की सदरहू परिसर हा सीआरझेड-1 मध्ये वर्गीकृत्त होता ,त्यावरिल सीआरझेडचे आरक्षण हे अवैधपणे बदलण्याबाबतचे चौकशीचे आदेश देण्यात यावेत.

त्याचप्रमाणे दुसरी सूचना आहे की रिज् रस्त्यावर एक चंदनबाला सोसायटी आहे. ती खूप आतल्या बाजूस आहे. चुकीच्या मार्कीगमुळे त्या सोसायटीची सीमाभिंत व सोसायटीचे पार्किंग बांधकामास गेले तीन महिने स्थगिती देण्यात आलेली आहे. ती तांत्रिक चुक आहे. त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी. वरिल दोन्ही सूचनांबाबत लेखी निवदने मी दोन तासात सादर करत आहे.

2) **श्री आय.सी. राव, आपली मुंबईनागरी संस्था, मुंबई**

आम्ही विविध क्षेत्रात कार्यरत असलेले नागरी फोरमचे सदस्य असून आमचा उद्देश हा पोर्ट क्षेत्र विकसन करणे आहे. आमच्या संस्थेने 6 मे, 2017 रोजी निवेदन सादर केलेले असून आम्ही मागणी



Scanned with CamScanner

केलेली आहे की शिवडी समोरील क्षेत्र हे क्रीक (खाडी) असे घोषित करुन विकसित करण्यात यावे. त्यामुळे तेथे जनतेसाठी सार्वजनिक सुखीसोयी, सुविधा उदा. सार्वजनिक बगीचा, मोकळी जागा, म्युझियम यांची गरज आहे. तरी शिवडीयेथे असलेला 500 मीटर्सचा बफर झोन मुंबई शहराच्या विकासासाठी गरजेचा नाही. आम्हास शिवडीक्षेत्रात सार्वजनिक बगिचा व शिवडी बंदर क्षेत्राच्या आत म्युझियम जनतेला हवे आहे.

त्यांनी सांगितले की सादर केलेल्या मागण्याची प्रत 6 मे, 2017 परत बैठकीत सादर करीत आहेत. आमची अपेक्षा होती की आम्हास चर्चेसाठी बोलविण्यात येईल. याबाबत आम्हांस चर्चेसाठी वेळ देण्यात यावा.

3) **श्री राहूल काद्री, आर्किटेक्ट व नागरी प्लॅनर---**

नविन नियमात सीआरझेड – 1मध्ये रस्ता व स्टिल्ट रस्ता असे दोन्ही पर्याय सूचविण्यात आलेले आहे. माझे यावर आक्षेप असून फक्त स्टील्ट रस्ताच विकसित करण्यात यावा. कारण नियमित रस्ता समुद्राचे भरती ओहोटीचे पाणी व प्रवाहाची दिशा ही पूर्णपणे बदलून टाकते, त्यामुळे भरती ओहोटीची जागा कायमची बदलते. तरी फक्त स्टील्ट रस्ताच सीआरझेड-1 मध्ये बांधण्यात यावा, दुसरा कुठलाही पर्यायाचा विचार करण्यात येऊ नये. उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्या सूचनेस पाठिंबा दिला.

4) **श्री दिलीप कोळी, कुलाबाः-**

जेटी बांधण्यास आम्ही विरोध केला, त्याबाबत आम्ही मेरिटाईम बोर्डाला पत्रव्यवहार केलेला आहे. मात्र त्यांनी आम्हाला न विचारता प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. जेटीमुळे समुद्राच्या पाण्याचा प्रवाह व मुंबईचा ट्रॅफिक जाम होणार आहे. तरी जेटी बांधण्याचा सदरहू प्रस्ताव रद्दबादल करण्यात यावा.

5) **श्वेता वाघ, भागीदार, कल्केटीव्ह फॉर स्पाटिकल अल्टरनेटिव्हस व असोशिएट प्राध्यापक, कमला रहेजा कॉलेज ऑफ आर्किटेकचर** -

त्यांनी तीन बाबतीत आक्षेप नोंदविताना सांगितले की -

अ) शासनाने पूर्वी घोषित केलेल्या सीआरझेडमधील संवर्गातील बदलामुळे सागरी पर्यावरण व समुद्रावरिल उपजिविकेवरिल योग्यप्रमाणातील संरक्षण नष्ट झाले आहे,

ब) संवर्गातील त्रुटीमुळे सागरी पर्यावरण व समुद्रावरिल उपजिविकेवरिल योग्य प्रमाणातील संरक्षण नष्ट व

क) सागरी क्षेत्र व्यवस्थापन योजनेतील पर्यावरण----

त्यावरीलबाबत संपूर्ण निवेदन वाचत असताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना फक्त मुद्यांबाबतच हरकती उपस्थित करण्याची सूचना केली. मात्र श्वेता वाघ यांना संपूर्ण निवेदन वाचून दाखविले. त्यांनी सीआरझेड मधील त्रुटीबाबत सविस्तर निवेदन वाचून दाखविले.



Scanned with CamScanner

संपूर्ण निवेदन वाचत असताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ही जनसुनावणी मुंबई शहरासाठी असल्याने फक्त मुंबई शहराबाबतच सूचना करण्याचा आदेश दिला.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना फक्त महत्वाचे मुद्देच बैठकीत उपस्थित करण्याची सूचना केली. सविस्तर मुद्दे सांगत बसू नये. लेखी सूचना ते देऊ शकतात असे आवाहन केले.

6) **श्री दिलिप नरहरी पागदरे, अध्यक्ष, माहिम मच्छिमारकार्यकारी सोसायटी व अध्यक्ष, माहिम रेती बंदर कोळीवाडा गावठाण रहिवाशी संघ -**

गिरगाव चौपाटी व माहिमसंदर्भात बऱ्याचवेळा आपल्या विभागात आलेलो आहे. मी कोस्टल मॉनिटरीग समितीचा सदस्य असल्याने बऱ्याच वेळा सूचना केलेल्या आहेत. आता येथे एक सूचना आहे की माहिम रेती बंदर येथील 1470 क्षेत्राचेबाह्य क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. मात्र अंतर्गत सर्वेषण करण्यासाठी आम्ही तीन पत्रे आपणास पाठविली आहेत, तरीही अजून त्याबाबत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे आजच्या संध्यानंद दैनिक वृत्तपत्रात बातमी आलेली आहे की महसूल विभागाने कोळीवाड्यातील राहत्या जागा स्थानिक कोळ्यांच्या नावावर करुन देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. तरी अंतर्गत सर्वेक्षणकरण्यात आलेले नाही. तरी ते करण्यात यावे.

त्याचप्रमाणे येथे नमुद करावसे वाटते की,गिरगाव चौपाटीवरिल स्थानिक कोळ्यांचे अस्तित्वनामोनिशाणच मिटलेला आहे. आमच्या पिढ्यानपिढ्या असणाऱ्या अस्तित्वाचा पुरावा दिलेले आहेत. भेळवाल्याला जागा दिल्या पण परंपरागत असणाऱ्या जागा काढल्या आहेत. तेथील मासेमारीही नष्ट झालेली आहे. कोळ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तरी राहत असलेल्या क्षेत्राचे अंतर्गत सर्वेषण करण्यात यावे ही विनंती.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, येथे व्यक्तीगत प्रश्न मांडण्यात येऊ नये. त्यासाठी हे व्यासपीठ नाही. सीआरझेड अधिसूचना जी प्रकाशित करण्यात आलेली आहे. त्यात सीआरझेड-1, 2 व 3 मध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्याबाबत काही आक्षेप वा सूचना असल्यास त्याच फक्त नोंदविण्यात याव्यात.

7) **श्री प्रकाश पाडुंरंग कोळी, वरळी गाव कोळीवाडाः-**

त्यांनी सांगितले की ते काही हरकती मांडत आहेत. 6-1-2018 च्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचनेपूर्वीच्या कोणत्या मालमत्ता ह्या संरक्षित करण्यात आलेल्या आहेत?सीआरझेडमुळे त्या तशाच ठेवणे हीस आमची हरकत आहे. किनाऱ्याजवळील कोळीवाडे सीमांकित झाल्यावर सदरहू कोळीवाडे, मासे सुकविण्याच्या जागा, बोटी नांगरण्याची जागा ह्या सीआरझेडमुळे सुरक्षित राहतील काय, आम्ही पाण्यातच राहतो/वेढलेलो आहोत. सीआरझेडनंतर आमच्या बाबत शासन काय निर्णय घेईल? वरळी कोळीवाड्याचा कोणता परिसर हा खाडीचा व कोणता समुद्राचा, सीआरझेडमुळे काही वेगळा निर्णय घेतला तर त्यास आमची हरकत आहे.



Scanned with CamScanner

8) **श्री प्रल्हाद वरळीकर, वरळी, मुंबईः-**

आम्ही मुंबईचे मूळ रहिवाशी, मूळ भूमीपुत्र आहोत. ज्यावेळी मुंबई व महाराष्ट्रात काहीच नव्हते, तेव्हापासून आमचे पूर्वज येथे राहत आहेत. तर सीआरझेड कायदा आम्हांस लागू आहे काय?जर तो आम्हांला लागू आहे, तर शिवाजीमहाराज स्मारक, समुद्रात होणारे नविन पूल व कोस्टल रोड यांना तो लागू आहे काय? सीआरझेडमुळे आमच्या गावाचा विकास होणार असेल, तर आम्ही भूमीपुत्र आहोत. तो विकास आम्हीच करणार. तो आम्हांलाच करायचा आहे. तो दुसऱ्याने करु नये. त्यासाठी नोटिफिकेशन काढण्याची गरज नाही. त्यास आमची हरकत आहे.

9) **श्री ओंकार गुप्ता, सदस्य, अर्बन डिझाईन इन्स्टियुट, मुंबई-**

मी वास्तूविशारद (आर्टिकेट) व नगर नियोजक (अर्बन प्लॅनर)आहे. आम्ही लेखी आक्षेप नोंदविलेले असून येथे काही सूचना नोंदवित आहोत. सीआरझेडबाबतचे नकाशे हे कॅडस्टल स्केलवर प्रकाशित करण्याची अधिसूचना असतानाही ते प्रकाशित करण्यात आलेले नाहीत. नकाशे हे खूप हाय स्केलला प्रकाशित करण्यात आलेले आहेत. ह्या स्केलला संपूर्ण तपशील बघता येत नाही. जर ते कॅडस्टल स्केलवर केले नसतील, तर प्रथम करण्यात यावे व नंतर आक्षेप, सूचना ह्या नोंदविण्यात याव्यात. जर नकाशात कोठे काय आहे हे कळत नसेल तर काही उपयोग नाही. नंतर जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. एका लाईनचा थिकनेस जवळजवळ प्लॉट एवढा आहे. उपस्थितांनी टाळ्या वाजवून पाठिंबा दर्शविला.

त्यांनी दुसरा आक्षेप नोंदविला की नकाशात कोठेही कोळीवाडे दाखविलेले नाही. ज्यांच्यासाठी सदरहू सीआरझेड कायदा आला, ते कोळीवाडे फक्त मुंबईच्या नकाशातच नाही, तर इतर भागातही दाखविण्यात आलेले नाहीत. त्याचप्रमाणे ब-याच गोष्टी दाखविण्यात आलेल्या नाहित. ट्रान्स हार्बर लिंकचे काम सुरु झालेले आहे. ते नकाशात नाही. कोस्टल रोड नकाशात नाही. जर नकाशे संपूर्ण नाहीत, तर त्यावर सूचना मागविणे ही शासनाची चूक आहे.

त्याचप्रमाणे धोका रेषा (Hazard Line) काळजीपूर्वक/योग्य प्रकारे आखण्यात आलेली नाही. मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे फ्लॅट लॅण्ड असून तेथे धोका रेषा चुकीची दाखविलेली आहे.

समुद्रापासून बंधनकारक असलेले 500 मीटर्स सीमाअंतर मुंबईत कुठल्या भागात आहे, ते दाखविलेले नाही. वरळी, दादर येथे सीमाअंतर 50 मीटर्स आहे. कारण ते बे (सामुद्रीधुनी) म्हणून घोषित करण्यात आलेलेआहे. तर मुंबई पोर्ट ट्रस्ट क्षेत्र हे क्रीक (खाडी) म्हणून घोषित करण्यात यावे.

10) **मिस राधिका सबावाला, मुंबईः-**

मला उपस्थितांनी नोंदविलेल्या आक्षेपात अजून एक आक्षेप नोंदवायचा आहे. जर अंतिम नकाशे पूर्ण नसताना, जनसुनावणी होण्याअगोदर व जनसुनावणीत करण्यात येणा-या सूचना, आक्षेप यांची नोंद घेणे आवश्यक असतानाही मुंबईत सागरी किना-यांवर कोस्टल रोड तयार करण्यास जमिन पुनर्भरण (Reclamation) करण्यास परवानगी कशी देण्यात आली?याचे उत्तर देणे आवश्यक आहे. सर्व जग पर्यावरण संरक्षणाचा प्राधान्य देत असताना व केंद्र शासन पर्यावरण संरक्षणाचा विचार करत असताना, त्यांनी कृत्तीव्दारे ते दाखविणे अपेक्षित आहे.



Scanned with CamScanner

11) **श्री प्रकाश लक्ष्मण चांदेकर, व्यवसाय-अभियंता, वरिष्ठ नागरीक, प्रभादेवी वरळी पूर्वः-**

मुंबईत कोस्टल रोडचा आवश्यकता नाही यासाठी मी मुंबई उच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल केलेली असून त्याचा नं. 25 आहे. मी मागणी केलेली आहे की कोस्टल रोडऐवजी मुंबईत डबलडेकर रोड आवश्यक आहे. त्यासाठी नकाशाही तयार करुन दिला असून सदरहू नकाशा मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. महानगरपालिकेने उत्तर योग्य प्रकारे दिले नसल्याने मला सुप्रीम कोर्टात धाव घ्यावी लागली. डबलडेकर रोड 10 कि.मी.लांब व त्यास खर्च फक्त 1200 कोटी प्रति कि.मी. येईल. तर कोस्टल रोडला 12,700 खर्च प्रति कि.मी. येईल व दक्षिण मुंबईत पार्किंगला जागा राहणार नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विषयाप्रमाणे आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

श्री चांदकेर यांनी आक्षेप नोंदविला की डबल डेकर रोड विकसित करताना सीआरझेडचा प्रश्न उद्भवणार नाही.

त्याचप्रमाणे हाजीअली ते वरळी येथे 140 वर्षांची जुनी भिंत आहे. असे म्हणतात की भिंत बांधल्यानंतरच मुंबईच्या निर्मितीस व प्रगतीस सुरवात झाली. तरी ती जतन करण्यात यावी.

12) **श्री मिलिंद वझे, महालक्ष्मी हाजीअली,मुंबई:-**

मी महालक्ष्मी हाजीअली परिसरात राहतो. कोस्टल रोड विकसित करताना प्रश्न माझ्या मनात येतो की मुंबईच्या उत्तरेकडील कोस्टल रोड हा स्टील्टवर तर दक्षिणेकडील कोस्टल रोड हारेक्लमेशननेविकसित करण्यात येत आहे. कोस्टल रोडचा उत्तरेकडील भाग हा स्टील्टवर विकासासाठी परवानगी. तर दक्षिणेकडील भागास जमिन पुनर्भरण (रेक्लमेशन) करण्यास परवानगी दिलेली आहे. हा फरक कशासाठी करण्यात आला. जर उत्तरेकडे पर्यावरणाचा विचार करुन स्टील्टवर परवानगी, तर दक्षिणेकडे पर्यावरणाचा का विचार केला जात नाही?

यावेळी काही उपस्थितांनी बैठकीचे सभागृह हे कमी आसनक्षमतेचे असल्याने बरेचलोकसभागृहाबाहेर उभे आहेत असे सांगून सर्वांना बोलण्याची संधी देण्याची मागणी केली. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना सूचना वा आक्षेप नोंदविण्याची संधि देण्यात येईल असे सांगितले. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना मोठे भाषण न करता आक्षेप वा हरकती नोंदविण्याची सूचना केली.

१३) **श्री गुलाब मिश्रा, कफपरेड, मुंबई:-**

मी कफ परेडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगरमध्ये राहतो. प्रॉपर्टी कार्ड नं. 658599. तेथे बफर झोन खूप आत आहे व तेथे अंदाजे 1000-1200 झोपड्या आहेत, त्या बफर झोनच्या बाहेर आहेत. तरी आपणास विनंती आहे की बफर झोन हा जेथे झोपड्या आहेत, तेवढा वाढविण्यात यावा.

१४) **श्री भूषण विष्णु निजाई, राहणार-माहिम कोळीवाडा,मुंबई:-**



Scanned with CamScan

मी माहिम कोळीवाड्यात राहतो. या सीआरझेडमुळे भूमीपुत्रांना उध्वस्त करण्याचा डाव आहे, असे दिसून येते. नकाशा पाहिल्यावर खालील सूचना पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस करण्यात येतात-

अ) मासेमारी जागा व वसाहती दाखविण्यात आलेल्या नाहीत. त्या दाखविण्यात याव्यात,

ब) भरती ओहटी पाहूनचत्याप्रमाणे मासेमारी करण्यात येते, भरती ओहोटीचे क्षेत्र दाखविण्यात यावे.

क) मच्छिमारांच्या वसाहती या तालुका व वाडा हद्दीतून बाजूला काढण्यात आलेल्या आहेत. त्या वसाहती तालुका व वाडा यात घेण्यात याव्यात.

**१५) श्री.प्रसाद ,कन्झरव्हेटीव्ह ट्रस्ट, मुंबईः-**

आम्ही लेखी निवेदन देत आहोत. त्याचबरोबर खालील सूचना, मुद्दे मांडत आहे -

अ) एनसीएससीच्या वेबसाईटवर अपडेटेड नकाशे आहेत. त्यासोबत कोणतीही नोटीस नाही की हे केंव्हा लोड झाले, सर्वांना माहित आहे की ते 16 जानेवारी, 2020 ला लोड झाले. पण त्यात नकाशात काय बदल करण्यात आले त्याबद्दल नोटीस नाही. तर ही नोटीस दर्शविण्यात यावी व त्यानंतर 45 दिवसांनी जनसुनावणी आयोजित करण्यात यावी व त्या नोटीशीत काय बदल केले ह्याचाही उल्लेख करण्यात यावा.

ब) धोका रेषा (Hazard Line) कशाप्रकारे आखण्यात आली, याचा उल्लेख नाही. त्यासाठी काय शास्त्रीय निष्कर्ष लावण्यात आले याबाबत काहीही माहिती नाही. त्यासाठी एनसीएससी यांनी सादरीकरण करावे,

क) 2011 सालीहीकोळीवाडे हे सीमांकित करण्यात आलेले नव्हते. आताही नाही. तरी कोळीवाडे, कोळ्यांची गावठाणे सीमांकित करण्यात यावे. फक्त मुंबईतच नाही तर सर्व ठिकाणी ते करण्यात यावे,

ड) प्रवाळांचे क्षेत्र सीमांकित झालेले नाही. मुंबई किनारी ते आढळतात.

**१६) श्री राजेश केणी,सायन कोळीवाडा, मुंबईः-**

आमचे कोळीवाडे नकाशात दाखविले नाहित, यावर आमचे आक्षेप आहेत. आम्ही मुंबईचे मूळ भूमीपुत्र आहोत. 1965 सालापर्यंत आम्ही सायन सीआरझेड क्षेत्रात होतो. मग आम्ही आमच्या खाजण जागा पाकिस्तानातून आलेल्या सिंधी व पंजाबी निर्वासितांना दिल्या. नंतर आमचे सीआरझेड उठविण्यात आला. सायन कोळावाडा 20%उध्वस्त केला. आम्ही येथील मूळ भूमीपुत्र. तर उरलेला आमचा उधवस्त करणार का? आम्हाला दुसरे गाव नाही. तर आम्ही समुद्रातच जायचे काय?. सायन कोळीवाड्यानंतर शिवडी कोळीवाड्याचा नंबर लागेल. गिरगाव कोळीवाडा हा पूर्वीच नष्ट झाला. तरी कोळीवाडे वाचवा, आम्हाला जगू द्या. जगातील इतिहासातून मोहेंजेदरो हरप्पा नष्ट झाले, तसे सायन कोळीवाड्याचे करु नका.

**१७) श्री गिरीश साळगावकर, कोळीवाडा गावठाण कृत्ती समिती:-**

लोक फक्त हरकती, सूचना देणार काय?. 2018 साली खूप लोकांनी भरपूर हरकती, सूचना जनसुनावणी बैठकीत दिल्या. त्याचे काय झाले हे प्रथम सांगण्यात यावे. आजही नकाशाचा स्केल



Scanned with CamScanner

लोकांना दिसत नाही. 2018 साली दिलेल्या हरकतींना उत्तर कधी देणार याचा खुलासा करावा. 6 सप्टेंबर, 2013 साली जिल्हा स्तरिय समिती बैठक झाली, त्यावेळी सांगण्यात आले होते की स्थानिक कोळी लोकांचे सहकार्य घ्या, सीमांकित करताना त्यांना बरोबर घ्या. शासनाच्या निर्णयास तीलांजली देण्यात आली. जानेवारी, 2018 घेतलेल्या हरकतींचे काय झाले, याचे उत्तर देण्यात यावे. त्याचप्रमाणे सीझेडएमपी ज्यासाठी बनला, त्यालाच हरताळ फासण्यात आलेला आहे.

तरी कोळीवाडा व गावठाणचे सीमांकन करण्यात यावे. त्याचबरोबर भविष्याचा विचार करुन गावठाणचे विस्तारीकरणलक्षात घेऊन सीमांकन करण्यात यावे व त्याची मालकी करा. त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे, त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षणाचाही प्रश्न आहे. नंतरच सीझेडएमपीची लाईन आखा.

चेन्नाईच्या समितीने सर्वेक्षण न करता अहवाल बनविलेला आहे, असाच अनुभव येतो. तर त्यांनी स्थानिकांचे सहकार्य घेऊनच अहवाल बनवावा.

**१८)<u>मिस सिरिन गांधी, वरळीगाव:-</u>**

नेपियन सी रोड ते वरळी नाका हा कोस्टल रोड तयार करण्यासाठी फक्त 20 हेक्टर जमिनीची आवश्यकता असताना 90 हेक्टर जमिनीचा पुनर्भरण करण्यात येत आहे. सदरहू रस्त्यासाठी 13,000 हजार कोटी खर्च येणार आहे. म्हणजे सामान्य माणसांनी भरलेला कर हा 2% लोकांसाठी वापरण्यात येत आहे.

**१९)<u>ॲड माधुरीताई पाटील, समाजसेविका, मुंबई:-</u>**

येथे उपस्थित असलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस मी विनंती करते की माझे बांधव जे कळकळीने ज्या हरकती मांडत आहेत, त्यावरुन त्यांच्यावरिल अन्यायाची कल्पना येईल. आमचे अस्तित्वच नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे. तो आम्ही कदापिही होऊन देणार नाही. त्याचप्रमाणे संबंधित संस्थेने प्रकाशित केलेले नकाशे हे इंग्रजीत आहेत. ते स्थानीक भाषेतच म्हणजे मराठीतच प्रकाशित करण्यात यावेत. सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे की 2011 अधिसूचनेनुसारच हे नकाशे बनविण्यात आलेले आहेत. आम्ही मच्छिमार समाज याबाबत हरकत नोंदवित असून जर 2011 मध्येच आमचे अस्तित्व नाकारले, तर 2019 साली आमचा नामोनिशाना नाही असेच आपण गृहित धरणार. जर संबंधित संस्था हे देशातील सर्व सागरीकिनारा राज्यांसाठी अहवाल तयार करत आहे, तर एक राज्यात मात्र सर्व सुविधा उदा.- लँडिंग सेंटर, फिशिंग जेटी, सीमाभिंत देण्यात येतात, तर मुंबईबाबत का नाही. आमची नावे महसुल अभिलेखात नोंदलेली आहेत. गिरगाव कोळीवाडा, सायन कोळीवाडा व इतर कोळीवाडा यांच्या नोंदी महसूल अभिलेखात आहेत. आमचा एक कोळीवाडा नष्ट झाला. आता सायन कोळीवाडा नष्ट करण्याचा प्रयत्न सुरु झालेला आहे. आम्ही सर्व कोळीबांधव सायन कोळीवाड्यांबरोबर आहोत. तरी आमची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की आमच्या भावनांचा विचार करावा. संबंधित संस्थेने वापरलेला स्केल हाही चुकीचा आहे.त्याचप्रमाणे 2011 च्या अधिसूचनेनुसार जर नकाशा बनवत असतील, तर तेच आक्षेपार्थ आहे. नकाशे सद्यस्थितीप्रमाणे सुधारित करा व ही जनसुनावणी आम्हांस पुरेशी नाही. कारण प्रत्येक व्यक्तींचे आक्षेप शासनापर्यंत पोहचले पाहिजे. त्याचप्रमाणे हरकतींवर आपण केलेली पुढील कार्यवाही आम्हा लोकांना समजली पाहिजे. ज्याप्रमाणे विकास योजनेची (डीपी) प्रक्रिया राबविण्यात येते, त्याचप्रमाणे येथेही राबविण्यात यावी. तसेच जर



Scanned with CamScanner

दीवदमणजवळ संबधित संस्थेने फिशिंग व्हिलेज दाखविले, तर येथे आमचे मच्छिमार बांधव का नाही दाखविले? आमची आग्रही सूचना आहे की आमचे मच्छिमार बांधव, गावे, बोटीच्या जागा, इतर सर्व सुविधा दाखविण्यात याव्यात. कोरल क्षेत्र दाखविण्यात यावे.त्याचप्रमाणे बायो डायव्हरसिटी म्हणून शहरातील क्षेत्रही विकसित करण्यात यावे. मागणी केल्याप्रमाणेच संपूर्ण नकाशा तयार करण्यात येऊन तो प्रकाशित करण्यात यावा. कारण सीमांकन समितीत संबंधीत संस्थेचे अधिकारी आहेत.सीमांकन होऊनही नकाशे चुकीचे दाखविले आहेत. तरी याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी व आमच्या समाजाच्या शाश्वत विकासासाठी समाजाने केलेल्या मागणीचा विचार करण्यात यावा.

**२०)श्री मुकुल, सिटिझन फोरमः-**

त्यांनी सीआरझेड-1 हा सीआरझेड-3 मध्ये कसे बदलण्यात आले याबाबत एक घटनेची नोंद घेण्यास सांगून सदरहू क्षेत्र हे हरितपट्टा म्हणून आरक्षित ठेवण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की त्यांच्या म्हणण्याची नोंद घेण्यात यावी. त्यांनी याबाबत लेखी निवेदन पूर्वीच मप्रनि मंडळास सादर केलेले आहे.

**२१) श्री राजेश खंडेपारकर, मुंबईः-**

त्यांनी सीआरझेड सीमांकित करताना वरळी सीजवळील भूखंड नं. सीएस-930 वर वीस मजली तीन इमारती असताना व सर्व इमारती ह्या सर्व नियमांनुसार विकसित केलेल्या असतानाही सदरहू क्षेत्र हे ना विकास क्षेत्र/नो डेव्हलपमेंट क्षेत्र -3 (एनडीझेड-3) कसे घोषित होते याबाबत विचारणा करुन त्याचे नव्याने सर्वेक्षण करण्याची मागणी केली. सर्व इमारतीतील गाळेधारकांना ओ.सी. प्रदान करण्यात आलेली आहेत. यावरुन असे दिसून येते की गुगलमॅपवरुन फक्त इमेजेस घेऊन सीआरझेड नकाशा करण्यात आलेला आहे.

**२२) श्री विशाल संचेती, मुंबईः-**

त्यांनी सांगितले की ते केस नं. 83, वडाळा विभाग याचे प्रतिनिधी असूनआम्ही आमचे लेखी निवेदन सादर केलेले असून परत सादर करत आहे.

**२३)उज्जवलाताई पाटील, महाराष्ट्र मच्छिमार कृत्ती समिती, समाजसेविका, मुंबईः-**

आज येथे मच्छिमार समाज आलेला आहे. त्यांचे व सीआरझेडचे नाते जवळचे आहे. 1951 सालचा नकाशा पाहिल्यास येथील मच्छिमारांचे समुद्रातील स्टेक्स - स्थानिक भाषेत त्यास गवी किंवा सर म्हणतात, ते दिसतील. त्या आमच्या मासेमारीच्या पारंपारिक जागा आहेत. तर आता एनसीएससीएम-संबंधित संस्थेने तयार केलेले नकाशे हे ब-याच हरकती उपस्थित करत आहेत. 1991 च्या सीआरझेड अधिसूचनेनंतर जवळजवळ 29 वेळा त्यात सुधारणा/बदल झालेले आहेत. ते बदल किना-यावरिल मच्छिमारांचा विचार न करता करण्यात आलेले आहेत. पिढ्यानुपिढ्या किना-यावर राहणा-या मच्छिमार समाजाचे अस्तित्व हे धोक्यात आलेले आहे. तो समुद्र सोडून जाऊ शकत नाही. अधिसुचनेत 9 जानेवारी, 2020 ला सुधारणा व परत लगेच 20 जानेवरी, 2020 ला सुधारणा अधिसुचनेत आणलेली आहे. त्यात ब्लु फ्लॅग सर्टिफिकेशन आणलेले आहे. त्यामुळे पारंपारिक मच्छिमारीच्या जागा बाधित होत आहेत. विकास आराखडा/योजनेतील (Development Plan) अधिका-यांनी नियमाप्रमाणे त्या दिलेल्या आहेत.



Scanned with CamScanner

त्या बाधित होणार आहेत. त्या जागा बाधित होऊ नये. विकास आराखडाव्दारे मच्छीमार वसाहतींचे सीमांकन झालेले असताना व वसाहतींचे विस्तारिकरण सीमाकंन अजूनही पूर्ण झालेले नाही. माजी मुख्यमंत्र्यांनी/शासनाने मच्छिमारांना आश्वासन दिलेले आहे की त्यांच्या पुरक व्यवसाय व त्यास लागणा-या, वापरात असणा-या जागेसहित त्यांच्या वसाहती विकसित करण्यात येतील. ती प्रक्रिया अपूर्ण असताना संबंधित एनसीएससीएम आमचे अस्तित्व त्यांच्या नकाशात दाखवत नाही. तरी आमच्या मच्छिमारांच्या व्यथा जाणून घ्या ही विनंती व संबंधित संस्थेने नकाशे विकास आराखड्याप्रमाणे तयार करावेत ही विनंती.

**२४)<u>श्री सुरेन कोळी, कोळीवाडा,</u>**

पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीचे अभिनंदन करताना बैठकीतील चर्चेचे मुद्दे जे लेखी घेण्यात येत आहेत ते हास्यास्पद वाटते, कारण दोन वर्षांपूर्वीही अशीच जनसुनावणी झालेली होती, खूप लोक सुट्टी घेऊन आले होते, खूप लोकांनी हरकती, सूचना व आक्षेप नोंदविले. त्याचे काय झाले हे कोणालाच माहित नाही. तरी शासनाने ब्रिटीश कालापासून स्थानिक कोळी, मच्छिमार यांच्या बाबत चे शासन निर्णय (जीआर) काढले आहेत, त्याचा अभ्यास करा, मासेमारीची ठिकाणे व गावठाण जागा याचा अभ्यास करा व नंतरच निर्णय घ्या.

**२५) श्री <u>दिगंबर कोळी, धारावी कोळीवाडा, मुंबईः-</u>**

येथे आलेल्या मच्छिमार बांधवांनी मुंबई शहराबाबत सागरीकिनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापनाबाबत आपल्या समस्या मांडल्या. उद्या बृहन्मुंबईचे मांडतील. मी धारावी कोळीवाड्यात राहतो. आमच्याकरिता कोस्टल झोन 1984 साली झाला. तेव्हापासून मासेमारी बंद आहे. नकाशात समुद्रकिनारा दाखविला, ओएनजीसी, बीएएसएफ दाखविले, मात्र कोळीवाडे दाखविलेले नाहीत. तरी सर्व कोळीवाड्यांचे सीमांकन झाल्यावर त्याचा नकाशात समाविष्ट करण्यात यावा व सागरीकिनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापनाबाबत निर्णय नंतर घेण्यात यावा.

**२६) <u>श्री सुहास कोलाबकर, कुलाबा कोळीवाडा, मुंबईः-</u>**

येथे चर्चा सीआरझेडवर होते. पण सीआरझेड कोळी लोकांसाठी आहे काय, तर नाही. मुंबईची भरभराहट व्यापारामुळे झाली. पण जर लहान बोटी नसत्या, तर कारखान्यासाठी यंत्रे नसती आणता आली. सात बेटांची मुंबई झाली. बेटांमध्येच कोळीवाडे अगोदर तेव्हापासून मुंबईत होते. ब्रिटिश जमान्याचा नकाशा आहे. 1906 सालचा. हा जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. शीट नं. 22. त्यात कुलाब्यात पाच कोळीवाडे आहेत. त्यात जमिनीमध्ये कोळ्यांची नावे आहेत. त्यावेळेपासून कोळीवाडे सीमाकंन करुन मासेमारीच्या जागा दिलेल्या होत्या. गिरगाव चौपाटी, दादर येथे मासेमारी होत होती. इतर ठिकाणीही कोळीवाडे होते. त्यांना मासेमारी करण्याचा अधिकार दिलेला होता. तो अधिकार ब्रिटिश जमान्यापासून होता. ज्यावेळी समा असते, तेव्हा रात्र असली तरी समुद्रावर जावे लागते. तरी कोळीवाडे सीमांकित करुन मच्छिमारांना त्यांचा व्यवसाय, मासेमारी साधने, बोटी लावण्याचे जागा याची सोय करण्यात यावी.



Scanned with CamScan

त्यांनी पुढे सांगितले की 1997 साली आमच्या कोळीवाड्याच्या जागी विक्रांत जहाज ठेवणार होते. त्यास आम्ही विरोध केला. कारण आमचा व्यवसाय बाधित होतात. आता विराट ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. तरी कोळी लोकांच्या व्यवसायाला बाधित होणारी धोरणे राबविण्याचा प्रयत्न करु नये.

२७) **श्री राजेश्री विजय नाखवा, मुंबई:-**

सर्वांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. ही मुंबई वसवली कोळ्यांनी आणि त्यालाच हद्दपार करण्यात प्रयत्न चालू आहे. आम्हा कोळ्यांना गाव नाही, शिव नाही. समुद्रावरील मासेमारी हा आमचा पारंपारिक धंदा आहे. तो आम्हांला शेवटपर्यंत करावाच लागतो. जरी भरती ओहोटी आहे, त्याप्रमाणे आमचे पुरुष मासेमारीसाठी जातात. आता गेट वे ऑफ इंडिया ते मांडवा जलवाहतुक चालते. आम्हां कोळ्यांना गाव नाही. समुद्रावरच आमचे जीवन व मरण आहे. आता आमच्या मासेमारीच्या जागाही जाणार. आमचा मासेमारी धंदा बंद करु नका ही विनंती आहे. आम्हांला जगू द्या.

२८) **मि.तारा, प्रतिनिधी, रितु देसाई,महालक्ष्मी:-**

त्यांनी सांगितले की त्या मिस रितु देसाई, महालक्ष्मी मंदिराशेजारील बिल्डींगमध्ये राहतात. तेथील समुद्रात स्थलांतरीत पक्षी व डोल्फिन्स येतात. जवळच महालक्ष्मी मंदिराजवळ हाजीअली दर्गा आहे. दोन्ही स्थळे ऐतिहासिक आहेत. जरी सीआरझेड प्रगतीसाठी असले, तरी प्रगती ही आंधळी नसावी. निसर्गाचे संरक्षण झालेच पाहिजे. कोळ्यांनी फिशींग करावे, त्यांना जगण्याचा अधिकार हिरावून घेऊ नये. त्यांनी पर्यावरण संरक्षणाच्या विविध मुद्यांवर भाष्य करुन लेखी निवेदन सादर केले.

२९) **श्री भूषण केणी, सायन कोळीवाडा, मुंबई:-**

मुंबईचा आराखडा झाला, त्यावेळी सात कोळीवाडयांचे सीमांकन झाले. सीमा निश्चत झाली. सायनकोळीवाड्यांचे सीमांकन झाल्यावर शासनाने आम्हांला घराचे 7/12 मिळतील असे सांगितले. कोळीवाड्याच्या जागी 200-300 वर्षापासून लोक राहतात. कोळीवाड्याच्या जमिनी रेल्वे व भूदल (आर्मी)साठी घेण्यात आल्या. आमच्या 200-300 वर्षांच्या घराला डिमोलिशनच्या नोटीसी येतात. तरी आम्हांला 7/12 देण्यात यावा. त्याचप्रमाणे कोळीवाड्यात देवीचे मंदिर असते. तेही नुकतेच तोडण्यात आले. दुसरे ग्रामदैवताचे मंदिर व तिसरे हनुमानाचे मंदिर असते. कोळीवाडयात असणा-या सर्व गोष्टी सायनकोळीवाड्यात असूनही त्यास कोळीवाडा का म्हणत नाही हा प्रश्न आता उपस्थित होतो.

३०) **मिस रियाझ सूद:-**

येथे बरेच आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. कोस्टल रोडसाठी जमिनीचे पुनर्भरण सुरु आहे. आपण घेतलेली आक्षेप जरी खरे असले, तरी प्रगतीसाठी कोळीवाडे नष्ट करण्यात येतील, जमिन पुनर्भरणामुळे स्थलांतरीत पक्षी, प्रवाळ जाईल. मग अशी स्थिती येईल की आपण परत स्वच्छ पर्यावरणासाठी काहीही करु शकणार नाही. तरी कोस्टल रोडचे काम त्वरित थांबणे गरजेचे आहे. तरी सर्वांनी सहकार्याने पर्यावरण संरक्षण करणे गरजेचे आहे.

३१) **मिस शेफाली—**



Scanned with CamScanner

त्यांनी वडाळा येथील भूखंडाचे सीआरझेड-1 स्टेटसआहे तसे ठेवण्याची विनंती केली.

**३२) श्री संकेत झा, कॉन्झर्वेशन एक्शन ट्रस्ट:-**

ठाणे क्रीकचा अंतीम स्थिती काय राहिल, कारण जर ठाणे क्रीक बे म्हणून घोषित केले तर त्यामुळे व्यापारीकरण वाढेल, एफएसआय वाढविण्यात येतील व त्यामुळे तेथील पर्यावरणाची हानी होईल. त्यामुळे ठाणे क्रीक का ठाणे बे घोषित करणार हे महत्वाचे आहे.त्याचप्रमाणे नुकताच पुराचा अहवाल प्रसिध्द झालेला असून त्याप्रमाणे समुद्राच्या पाण्याची पातळी ही तीनपट वाढेल. त्यामुळे समुद्रातजवळील भूखंड हे पाण्यात जातील. तरी ठाणे बे घोषित करु नये. तरी याबाबत शासनाने त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे.

**३३) श्री धनेश शहा, सहसचिव, चंदनवाला सोसायटी, मलबार हिल, मुंबई:-**

आमचे लोकप्रतिनिधी यांनी आमच्या प्रश्नांबाबत निवेदन केलेले आहे. आमच्या सोसायटीत स्टील्ट गॅरेज होते. ते 2016 साली पडले. आम्ही ते परत विकसित करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यावर सीआरझेड बाधीत अशी नोंद संबंधित विभागाने केली. मात्र आम्ही मिळविलेल्या माहितीनुसार आम्ही सीआरझेड हा भूखंडाच्या बाजूस आहे. आम्ही बाधित नाही. तरी आम्हांस सहकार्य करावे ही विनंती.

**३४) श्री दिलिप शेखदर, मुंबई पोर्ट ट्रस्ट:-**

त्यांनी निवेदन दिले की –

अ) मुंबईचा पूर्वकडील समुद्र (eastern water front) हे बे (Bay) म्हणून घोषित करण्यात यावा,कारण -

आ) आयआयटी, चेन्नई यांनी केलेल्या अभ्यासाप्रमाणे मुंबईचा पूर्वेकडील समुद्र बे घोषित करण्यास पुष्टी मिळते,

इ) युनायटेड नेशन्सच्या लॉ ऑफ द सी, 1982 नुसार मुंबईचा पूर्वकडील समुद्र (eastern water front) विविध घटकांचा विचार करुन बे घोषित करण्यास योग्य,

ई) मुंबईची जुनी गॅझेटस् याबाबत पुष्टी देतात,

सीआरझेड अंतर्गत त्यांनी 500 मीटर्स अंतर सोडणे बंधनकारक असण्याबाबत पुनर्विचार त्वरित करण्याची विनंती केली.

**३५) धनीश शाह, मुंबई:-**

मी संबंधित संस्था – एनसीएससी ला प्रश्न विचारते कीनकाशे तयार करताना स्थानिक किती कोळीवाडयात गेले, कोणकोणत्या व्यक्तींना तेथे भेटले, याबाबत सविस्तर माहिती सांगण्यात यावी. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी संबधित व्यक्तींना त्यांची हरकत नोंदविण्याची सूचना केली. त्यावेळी संबंधित व्यक्ती ह्यांनी उत्तराची मागणी वारंवार करत होत्या. त्यांनी आक्षेप नोंदविला की संबंधित संस्थेने तयार केलेल्या अहवालाची इंग्रजी व स्थानिक भाषा मराठीत एक प्रत स्थानिक व प्रकल्प बाधीतांना आगाऊ उपलब्ध करणे बंधनकारक असताना उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. मुंबईच्या सागरी किना-यावर प्रवाळ, स्थलांतरित स्थानिक पक्षी मोसमाप्रमाणे येत असतात.



Scanned with CamScanner

या संस्थेने कोणतेही पाहणी सर्वेक्षण (फिल्ड सर्व्हे) केलेले नाही. विविध कोळीवाड्यात व मच्छिमारी स्थानांवर जाऊन पाहणी सर्वेक्षण केलेले नाही. नकाशे अपूर्ण दाखवून स्थानिकांना आक्षेप नोंदविण्यास सांगणे पूर्णपणे चुकीचे आहे. स्थानिकांना अंधारात ठेऊन काहीही करु नका. येथील सामान्य कोळी जे बाधित होणार आहेत, त्यांना काय माहिती सीआरझेड-1,2,3,4 म्हणजे काय. 2011 च्या चुकीच्या नकाशावर 2019 चा नकाशा बनविलेला आहे. संबंधित संस्थेचे प्रतिनिधी काहीही उत्तर देत नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनाणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले संबंधित प्रतिनिधी नकाशाचे माहिती इंग्रजीत सांगतील व त्याचे भाषांतर मराठीत त्यांचे दुसरे प्रतिनिधी करतील.

बैठकीत उपस्थितांनी मागणी केली की सीआरझेडची मासिक बैठक होते, त्या समितीवर मच्छिमारांचे तीन प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात यावी.

येथे धनिश शाह यांनी मागणी केली की उपस्थितांना केलेले आक्षेपांवर काय कार्यवाही करण्यात आली हे समजण्यासाठी कार्यवाही केलेली माहिती पब्लिक डोमेनवर उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले16 जानेवारी, 2020 रोजी सर्व नकाशे mczma.gov.in या पब्लिक डोमेनवर टाकण्यात आलेली होती. तुम्ही मोघम न बोलता प्रत्येक नकाशाबाबत आक्षेप नोंदवू शकता. मात्र मोघम बोलू नये. म्हणजे प्रत्येक नकाशावर वन टू वन तुम्ही आक्षेप नोंद्विणे अपेक्षित होते. येथे धनिश शाह यांनी मत मांडले की अपूर्ण माहितीवरुन आक्षेप नोंदविणे त्यांना शक्य नाही.

उपस्थितांनी सांगितले वरळी कोळीवाड्याहून कोळीबांधव आलेले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन योग्य प्रकारे बनविण्यात आलेला नाही. नकाशात वरळी फिशींग झोनचा काहीही उल्लेख नव्हता. मॅपिंगही झालेले नाही. आता जमिन पुनर्भरण सुरु झाल्याने त्याचा काय परिणाम होते हे जाणण्याची त्यांची इच्छा होती.

३६) <u>**श्री गंगापूर तुकाराम ठाकर, मुंबई**</u>

यांनी आक्षेप नोंदविला की वांद्रे ते दहिसर हा कोस्टल रोड केला आहे, त्यासाठी सीआरझेड नियम लावलेले आहेत. मात्र वरळी ते कुलाबा ह्या मार्गावर कुठलेही सीआरझेड नियम न लावता काम चालू केलेले आहे. त्यासाठी हरकत अशी आहे की त्यामुळे सीआरझेड नियम नसल्यामुळे तेथे भराव केलेला आहे. त्यामुळे तेथील मासेमारी क्षेत्र पूर्णपणे उधवस्त झालेले आहे. त्यामुळे मासेमारी करणारे तेथे मासेमारी करु शकत नाही. येथील मासेमारी क्षेत्र नकाशात दाखविले पाहिजे. मासेमारी करु न शकल्याने आमचे लोक आता उध्वस्थ होणार आहेत. त्याचप्रमाणे मच्छिमार गेले 100 वर्षे वरई बंदरातून बोटी ने-आण करत. तो मार्गही बंद करण्याच्या तयारीत आहेत. तो ने-आण करण्याचा मार्गही नकाशात दाखविण्यात आलेले नाही. तो दाखविण्यात यावा.

३७) <u>**श्री अरविंद सैगवाल,मुंबई:-**</u>

ठाणे क्रीकचे डिमार्केशन सॅटलाईट इमेजला टाकले तर खूपच चांगले दिसते. जेथे समुद्र गहरा आहे, तेथे दिसतो. आज तो माहुलपर्यंत दिसतो. तो पुर्वी सीबीडीपर्यंतच दिसत होता. त्याचे कारण काय आहे हे शोधणे आवश्यक आहे.



Scanned with CamScan

३८) **<u>श्री हिरेन दफ्तरदार, उप-मुख्य प्लॅनर, मुंबई पोर्ट ट्रस्ट:</u>**

त्यांनी सांगितले की डीपी 2034 आणि डीसीपीआर 2034 हे एमआरटीपी कायदा, 1966 चे सर्व निष्कर्ष पाळून तयार करण्यात आलेले आहेत. तरी डीपी 2034 व डीसीपीआर 2034 व अधिसूचना ही डीपी 2034 च्या संमतीस मान्यता द्यावी.

३९) **<u>मिस प्राची म्हसकर:-</u>**

मी आक्षेप नोंदविलेले आहेत. मुंबई उच्चन्यायालयाच्या आदेशानुसार शासकीय जमिनीवर 1,000 स्केअर मीटर तिवरांचे जंगल असेल तर 50 मीटर्स अंतर बंधनकारक आहे.

त्यांनी सूचना केली की मुंबईचा पुर्व किनारा हा बे म्हणून घोषित करण्यात यावा. त्याप्रमाणे खाजगी जमिनीसाठी तिवराच्या जंगलापासूनचे अंतर हे प्रत्येक वेळी त्या त्या प्रत्येक केसप्रमाणे ठरविण्यात यावे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट, चेन्नाई यांच्या प्रतिनिधीनि अहवालासंबंधी माहिती देण्यास सुरवात केली. त्यांना आवाहन केले की अहवाल तयार करताना त्रुटी राहिल्या असतील, तर त्या सांगाव्यात. त्याचप्रमाणे एखादी गोष्ट अहवालात राहिली असेल तर ती दाखवावी. म्हणजे अंतिम अहवालाता त्याचा समावेश करण्यात येईल. सदरहू अहवाल हा केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तयार करण्यात आलेला आहे. त्यांनी सीआरझेड-1, 2, 3 याचे वर्गीकरण कसे केले याबाबत सविस्तर माहिती सांगितली. त्यांनी सांगितले की मोघम प्रश्न विचारण्यात येऊ नये.तर विशिष्ट प्रश्न विचारण्यात यावा.

त्यांनी पुढे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वांनुसार धोका रेषा ही फक्त आपत्कालिन व्यवस्थापन योजनेसाठीच आहे.

त्यांच्या निवेदनानंतर स्थानिकांनी आपसात चर्चा करताना मत मांडले की संबंधित संस्थेने फक्त भौगोलिकप्रकारे अभ्यास केलेला आहे. लोकसंख्या शास्त्र्यांनुसार केलेले दिसत नाही. जिथे लोक राहतात, त्याचा विचार केलेलाच नाही. त्याचप्रमाणे पुनर्वसनबाबत कोणती जागा हे विचारात घेतलेले नाही.

४०) **उज्ज्वलाताई पाटील** यांनी मत मांडले की पुनर्वसनासाठी मुंबईत जागा कुठे आहे.

४१) **श्री वरळीकर** यांनी प्रश्न विचारला की पेपरवाले हे गुंतवणूकदार आहेत.

४२) **धनेश शाह यांनी** धोका रेषेचे महत्व सांगताना माहिती दिली की, धोका रेषा ही समुद्रकिना-यावर राहणा-या लोकांसाठी महत्वाची आहे. कारण आपणास माहित आहे की पूर अहवालानुसार 2030 साली मुंबई पाण्यात जाईल. बऱ्याच वेळा असा अनुभव आहे की, पावसाळ्यात समुद्राचे पाणी भिंत फोडून येते. आता धुप (इरोशन) ही राष्ट्रीय आपत्ती आहे. किनारी व्यक्तींना पावसाळ्यातील धोका समजण्यासाठी धोका रेषा आहे. त्याचप्रमाणे सीएसआरमधील कॅटगरी बदलण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे दहा वर्षे होऊनही नकाशामध्ये कोरलबाबत साधाही उल्लेख नाही. 2019 च्या अधिसुचनेनुसार फिशिंग झोन



Scanned with CamScanner

दाखवणे बंधनकारक आहे. ते दाखविण्यात आलेले नाही. उपस्थितांनी सदरहू माहिती जाणूनबुजुन पुरविली नाही असा आरोप केला.

४३) **उज्जवलाताई पाटील यांनी** माहिती दिली की युनोने शाश्वत विकासासाठी काही मार्गदर्शक तत्वे पारित केलेला आहेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या हरकती, आक्षेप, सूचना यांचा नोंद करण्यात आलेले असून त्याचा बैठकीच्या इतिवृतान्तात समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे ब-याच कोळीवाड्याचा उल्लेख नाही याची नोंद घेण्यात आलेली आहे. आपत्कालिन व्यवस्थापन योजनेबाबतही नोंद घेण्यात आलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पुढे सांगितले की मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप, बैठकीतील लेखी आक्षेप बैठकीच्या इतिवृत्तान्तासोबत पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी आक्षेप नोंदवायचे असतील, त्यांनी ते स्थानिक मप्रनि मंडळास सादर करावेत. तेही अंतिम अहवालासोबत केंद्र शासनास पाठविण्यात येतील. त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांच्याकडे मुंबई जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. त्यांच्या कार्यालयास रोज कमीतकमी 5-6 तक्रारी विविध कोळीवाडयांच्या संदर्भात असतात. या बैठकीस मोठ्या प्रमाणात उपस्थिती व उत्सुर्फतपणे मांडलेल्या हरकती, आक्षेप यावरुन स्थानिक कोळी, मच्छिमारी बांधवांच्या व्यथा समोर येतात. त्यांनी सर्व उपस्थितांचे, शासकीय अधिका-यांचे आभार मानले व बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.



Scanned with CamScanner

दाखवणे बंधनकारक आहे. ते दाखविण्यात आलेले नाही. उपस्थितांनी सदरहू माहिती जाणूनबुजुन पुरविली नाही असा आरोप केला.

४३) **उज्जवलाताई पाटील यांनी** माहिती दिली की युनोने शाश्वत विकासासाठी काही मार्गदर्शक तत्वे पारित केलेला आहेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या हरकती, आक्षेप, सूचना यांचा नोंद करण्यात आलेले असून त्याचा बैठकीच्या इतिवृतान्तात समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे ब-याच कोळीवाड्याचा उल्लेख नाही याची नोंद घेण्यात आलेली आहे. आपत्कालिन व्यवस्थापन योजनेबाबतही नोंद घेण्यात आलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पुढे सांगितले की मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप, बैठकीतील लेखी आक्षेप बैठकीच्या इतिवृत्तान्तासोबत पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी आक्षेप नोंदवायचे असतील, त्यांनी ते स्थानिक मप्रनि मंडळास सादर करावेत. तेही अंतिम अहवालासोबत केंद्र शासनास पाठविण्यात येतील. त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांच्याकडे मुंबई जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. त्यांच्या कार्यालयास रोज कमीतकमी 5-6 तक्रारी विविध कोळीवाडयांच्या संदर्भात असतात. या बैठकीस मोठ्या प्रमाणात उपस्थिती व उत्सुर्फतपणे मांडलेल्या हरकती, आक्षेप यावरुन स्थानिक कोळी, मच्छिमारी बांधवांच्या व्यथा समोर येतात. त्यांनी सर्व उपस्थितांचे, शासकीय अधिका-यांचे आभार मानले व बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

मप्रनि कार्यालयास व बैठकीत एकूण ८६ हरकती/सूचना/आक्षेप नोंदविण्यात आले. सोबत जोडण्यात आलेले आहेत.

(श्री. तानाजी यादव)
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मुंबई-१,
मप्रनि, मुंबई

(डॉ. अनंत हर्षवर्धन)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मुंबई,
मप्रनि, मुंबई

(श्री. बन्सी गवळी)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी जिल्हादंडाधिकारी, मुंबई
जिल्हा-मुंबई



Scanned with CamScanner